## नवी मुंबई महानगरपालिका

## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 25 जून 2019 रोजी भरलेल्या माहे जून 2019 महिन्याच्या सर्वसाधारण तहकूब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 1**<br>**दिनांक 20 जून 2019** | **इतिवृत्त -** दिनांक 24 डिसेंबर 2018, दिनांक 03 जानेवारी 2019 (भाग 1, 2 व 3) |
| **निर्णय** | **कायम** |
| **विषय क्र. 2**<br>**दिनांक 20 जून 2019** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03**<br>**दिनांक 20 जून 2019** | महिला व बालकल्याण समितीच्या सभेतील विषय क्र. 1, ठराव क्र. 12.<br>"**संदर्भ**:- आयुक्तांचे दिनांक 14 जानेवारी 2019 चे पत्र<br>जा.क्र.नमुंमपा/स.वि.वि/74/2019.<br>"महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीस याद्वारे अशी शिफारस करीत आहे की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील खालील अटी शर्ती लागू करून पूर्वीप्रमाणेच शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित करणेस, 1. एका घरातील एकाच लाभार्थ्यांला शिष्यवृत्तीचा लाभ देणे. 2. आर्थिक दुर्बल घटकातील सर्व लाभार्थ्यांना उत्पन्न दाखल्याची अट बंधनकारक करणे व सन 2018-19 या आर्थिक वर्षात व पूढे उपरोक्त नमूद केलेल्या अटी शर्तीसहित शिष्यवृत्तीची योजना राबविण्यास, तसेच अंदाजपत्रकीय मंजूरीच्या मर्यादेच्या खर्चास अधिन राहून शिष्यवृत्ती योजना राबविणेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **ठराव क्र. 1125**<br>**दिनांक 25 जून 2019** | "महिला व बालकल्याण समिती महापालिकेला याद्वारे अशी शिफारस करण्यात येते की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तसेच प्रस्तावात नमूद करण्यात आलेली सन 2016-2017 या आर्थिक वर्षापासून पूढे पंचवार्षिक या कालावधीकरिता या प्रस्तावाप्रमाणे राबविण्यात आलेल्या बाबी, तसेच पुढील पंचवार्षिक योजनांमध्ये सदर दिलेल्या प्रस्तावातील अट क्र. 1 मधील एका घरातील 2 लाभार्थी ऐवजी एका घरातील 1 लाभार्थीला शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव नव्याने सादर करण्यात यावा असा बदल करण्यास, तसेच उत्पन्नाची अट शिथील करणेस यावी आणि सन 2018-2019 या वर्षात जेवढ्या लाभार्थ्यांनी अर्ज केले आहेत तेवढ्या सर्व पात्र लाभार्थ्यांना मर्यादेच्या खर्चास अधिन राहून यापूढे पंचवार्षिक आर्थिक वर्षात राबविणेस, सूचविल्याप्रमाणे प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी" |
| **निर्णय** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 04**<br>**दिनांक 20 जून 2019** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये Surveillance करिता सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/01/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./92/2019. |
| **ठराव क्र. 1126**<br>**दिनांक 25 जून 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये Surveillance करिता सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 154.34 कोटी मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 05**<br>**दिनांक 20 जून 2019** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नळजोडणीधारकांना आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/03/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./ 730/2019. |
| **ठराव क्र. 1127**<br>**दिनांक 25 जून 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नळजोडणीधारकांना आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सद्यस्थितीत महानगरपालिकेतर्फे लागू असलेले दर प्रस्तावातील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे असून, नवी मुंबई महानगरपालिकेचे सन 2018-2019 चे सुधारीत व सन 2019-2020 मूळ अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेस मान्यतेस सादर करण्यात आलेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेकडून आकारण्यात येत असलेल्या पाणीदारांमध्ये कोणतीही वाढ करणे किंवा पाणी दर कमी करणे प्रस्तावित नाही. नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे नळजोडणी धारकांना आकारण्यात येणाऱ्या दरांबाबत अंदाजपत्रक सादर करते वेळी मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्रचलित दरांमध्ये कोणतेही बदल न करता मा.सर्वसाधारण सभेस अवगत होणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |

**महानगरपालिकेने शिफारस केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.**

| **पाणी वापराचा प्रकार** | **प्रस्तावात नमुद करण्यात आलेले पाणी दर** | **महानगरपालिकेने केलेली शिफारस** |
|---|---|---|
| घरगुती वापर<br>जलमापक धारक ग्राहक :-<br>अ) पुर्वीचे फ्लॅटरेटधारक (सध्याचे जलमापकधारक) | दरमहा प्रती कुटुंब 30,000 लिटर पाणी वापरापर्यंत सरसकट दर महा प्रती कुटुंब रु.50/- व त्यापुढील प्रती 1000 लिटर पाणी वापरासाठी रु.4.75/- | -- |
| ब) गावठाण व झोपडपट्टीतील जलमापकधारक घरगुती ग्राहक | रु. 4.75/- प्रती 1000 लिटर्स | **दरमहा प्रती कुटुंब 30,000 लिटर पाणी वापरापर्यंत सरसकट दर महा प्रती कुटुंब रु.50/- व त्यापुढील प्रती 1000 लिटर पाणी वापरासाठी** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रु.4.75/- |
| | क) वरील "अ" व्यतिरिक्त सर्व प्रकारच्या निवासी इमारती. | रु. 4.75/- प्रती 1000 लिटर | **दरमहा प्रती कुटुंब 30,000 लिटर पाणी वापरापर्यंत सरसकट दर महा प्रती कुटुंब रु.50/- व त्यापुढील प्रती 1000 लिटर पाणी वापरासाठी रु.4.75/-** |
| | ड) फ्लॅटरेट धारक (सिडकोने बांधलेली घरे) | i) बांधकाम क्षेत्रफळ - (0 ते 25, 25 ते 40, 40 ते 50, 50 ते 60, 60 ते 70, 70चौ.मी व त्यापेक्षा जास्त)- रु.60/-, रु.65/-, रु.72/-, रु.85/-, रु.90/- प्रती घरटी व प्रती महिना.<br>ii) आर. एच-1,2,3,4 व त्यापेक्षा जास्त- रु.75/-, रु.92/- रु.100/- प्रती घरटी व प्रती महिना | -- |
| | इ) विना जलमापक ग्राहक- मूळ गावठाण/झोपडपट्टी | प्रती घरटी प्रती महिना रु.50/- | -- |
| | ई) सार्वजनिक नळ खांबावरुन पाणी भरणारे ग्राहक/विना नळ जोडणी ग्राहक | प्रती घरटी प्रती महिना रु.30/- | -- |
| | उ) 15 मी.मी. व्यासाची फ्लॅटरेट नळजोडणी (घरगुती वापरासह दुकाने, भाजीपाला, टेलिफोन बुथ, किराणा, जनरल स्टोअर, दवाखाना, वखार, गॅरेज, सलून इ.) | रु.91/- प्रती महिना | -- |
| | **पाणी वापराचा प्रकार** | **प्रस्तावात नमुद करण्यात आलेले पाणी दर** | **महानगरपालिकेने केलेली शिफारस** |
| | सार्वजनिक वापर :- | रु. 11/- प्रती 1000 | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| | शाळा, कॉलेज, धर्मादाय नोंदणीकृत संस्था, शिक्षण मंडळे, सरकारी कार्यालये (सिडको, म.टे.नि.लि., म.रा.वि.वि.कं.लि.वगळून),तरण तलाव | लिटर | |
| | वाणिज्य वापर:-<br><br>• जलमापक धारक ग्राहक<br>सर्व प्रकारच्या वाणिज्य आस्थापना, बांधकाम, हॉटेल्स, खाजगी दवाखाने व हॉस्पिटल्स, सरकारी, निमसरकारी कार्यलये (सिडको, म.टे.नि.लि., म.रा.वि.वि.कं.लि.), विश्राम गृह, उद्योग, दुकाने भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत बांधकामाच्या सर्व साईटस् इ.<br>अ) ज्या ग्राहकांचा पाणी वापर 50 घ.मी. प्रती दिन पेक्षा कमी आहे असे ग्राहक | रु. 30/- प्रती 1000 लिटर | -- |
| | ब) ज्या ग्राहकांचा पाण्याचा वापर 50 घ.मी. प्रती दिनी पेक्षा जास्त असेल असे ग्राहकांसाठी.(मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती वगळून) | रु. 20/- प्रती 1000 लिटर | -- |
| | **पाणी वापराचा प्रकार** | **सद्याचे पाणी दर** | |
| | क) 15. मी.मी. व्यासाची फ्लॅटरेट नळजोडणी (घरगुती वापरासह दुकाने, भाजीपाला, टेलिफोन बुथ, किराणा, जनरल स्टोअर, दवाखाना, वखार, गॅरेज, सलून इ.) | रु. 91/- प्रती महिना | -- |
| | विना जलमापक ग्राहक (गावठाण व झोपडपट्टी क्षेत्रा अंतर्गत)<br>अ) 15.मी.मी. व्यासाची | रु. 1,830/- प्रती महिना | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| | फ्लॅटरेट नळजोडणी (हॉटेल्स,रेस्टॉरंट, बार, बेकरी, सर्व्हिस सेंटर, लादी कंपनी इ.) | | |
| | **पाणी वापराचा प्रकार** | **प्रस्तावात नमुद करण्यात आलेले पाणी दर** | **महानगरपालिकेने केलेली शिफारस** |
| | ब) 15. मी.मी. व्यासाची फ्लॅटरेट नळजोडणी (किरकोळ दुकाने,लॉण्ड्री, मटन शॉप, फिश शॉप,टी स्टॉल, फरसाण मार्ट इ.) | रु. 240/- प्रती महिना | -- |
| | क) फ्लॅटरेट धारक (सिडकोने बांधलेली दुकाने) | i) बांधकाम क्षेत्रफळ - (0 ते 25, 25 ते 40, 40 ते 50, 50 ते 60, 60 ते 70, 70 चौ. मी व त्यापेक्षा जास्त)- रु.101/-, रु.106/-, रु.113/-, रु.126/-, रु.131/- प्रती घरटी व प्रती महिना<br>ii) आर. एच-1,2,3,4 व त्यापेक्षा जास्त- रु.116/-, रु.141/- रु. 100/- प्रती घरटी व प्रती महिना | -- |
| | • बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र असलेल्या व भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या मात्र रहिवाशी वापर सुरु असलेल्या इमारती/घरे.<br>अ) एक वर्षाच्या आत भोगवटा प्रमाणपत्र सादर करणेच्या अधीन एक वर्षापर्यंतचा पाणी दर | रु. 4.75/- प्रती 1000 लिटर | -- |
| | ब) एक वर्षापर्यंत भोगवटा प्रमाणपत्र सादर न केल्यास एक वर्षांनतरचा पाणी दर | रु. 15/- प्रती 1000 लिटर<br>(वाणिज्य दराच्या 50 टक्के) | **दरमहा प्रती कुटुंब 30,000 लिटर पाणी वापरापर्यंत सरसकट दर महा प्रती कुटुंब रु.50/- व त्यापुढील** |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td>प्रती 1000 लिटर पाणी वापरासाठी रु.4.75/-</td></tr>
<tr><td></td><td>• मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती</td><td>प्रतीदिन 50,000 लिटर वापर असल्यास रु.30/- प्रती 1000 लिटर प्रमाणे व प्रती दिन 50,000 लिटर पेक्षा जास्त वापर असल्यास रु.20.00 प्रती 1000 लिटर</td><td>--</td></tr>
<tr><td></td><td>नमुंमपा मालमत्ता नमुंमपाच्या सर्व नळजोडण्या उदा. पीरवहन सेवा, विष्णुदास भावे नाटयगृह, उदयाने, सार्वजनिक शौचालये, शाळा, हॉस्पिटल्स वगैरे</td><td>रु. 4.75/- प्रती 1000 लिटर</td><td>--</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td colspan="3">सुधारणेसह मंजूर</td></tr>
<tr><td>विषय क्र. 06<br>दिनांक 20 जून 2019</td><td colspan="3">नवी मुंबई शहरातील आपत्ती व्यवस्थापन केंद्र मजबूत करणे व महानगरपालिका क्षेत्राची आपत्ती जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने युएनडीपीला ज्ञान भागीदार करुन नवी मुंबई महानगरपालिका व युएनडीपी यांच्या मार्फत सन 2019-2021 वर्षाकरीता विविध कामे करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/05/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/आ.व्य./ 152/2019.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. 1128<br>दिनांक 25 जून 2019</td><td colspan="3">"नवी मुंबई शहरातील आपत्ती व्यवस्थापन केंद्र मजबूत करणे व महानगरपालिका क्षेत्राची आपत्ती जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने युएनडीपीला ज्ञान भागीदार करुन नवी मुंबई महानगरपालिका व युएनडीपी यांच्या मार्फत सन 2019-2021 वर्षाकरीता विविध कामे करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, UNDP यांचेकडून नमुंमपास आपत्ती धोके निवारण कार्यक्रम (DRR) मध्ये नॉलेज पार्टनर म्हणून नमुंमपा सोबत नमुंमपातील विभागातील आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा या लेखाशिर्षकातून होणाऱ्या एकूण रक्कम रू. 3 कोटी, 80 लाख, 17 हजार 361 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td colspan="3">नामंजूर</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **विषय क्र. 07**<br>**दिनांक 20 जून 2019** | नमुंमपा रुग्णालयांकरीता आवश्यक औषधे, तदअनुषंगिक उपभोग्य वस्तु व वैदयकिय उपकरणे या बाबींची खरेदी महाराष्ट्र शासनाच्या शासननिर्णयानुसार हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) मार्फत करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 31/05/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/2995/2019. |
| **ठराव क्र. 1129**<br>**दिनांक 25 जून 2019** | नमुंमपा रुग्णालयांकरीता आवश्यक औषधे, तदअनुषंगिक उपभोग्य वस्तु व वैदयकिय उपकरणे या बाबींची खरेदी महाराष्ट्र शासनाच्या शासननिर्णयानुसार हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) मार्फत करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, शासननिर्णयात नमूद केल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांना लागणाऱ्या औषधे, तद्अनुषंगिक उपभोग्य वस्तू व वैद्यकिय उपकरणे इत्यादी बाबींची खेरदी हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि.(खरेदी कक्ष) यांच्याकडून करावयाची असल्यास त्या विभागांना तशी मुभा राहील असे नमूद आहे. ही बाब विचारात घेऊन शासननिर्णयानुसार निविदा व खरेदीची एकूण सर्व प्रक्रिया हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) यांच्यामार्फत करावयाची असल्याने, नमुंमपाच्या आरोग्य विभगाकरीता औषधे, सर्जिकल साहित्य, पॅथॉलॉजी साहित्य, इतर तद्अनुषंगिक उपभोग्य वस्तू, वैद्यकिय उपकरणे, रूग्णालयीन फर्निचर, मेडिकल गॅस पाईपलाईन उभारणी करणे इ. बाबी आवश्यकतेनुसार वेळोवेळी हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) यांचेमार्फत खरेदी करणे, व त्याकरीताचा आवश्यक निधी वेळोवेळी हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) यांचेकडे वर्ग करणेस, **याऐवजी हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) यांच्यामार्फत नमुंमपाच्या आरोग्य विभागाकरीता औषधे, सर्जिकल साहित्य, पॅथॉलॉजी साहित्य, इतर तद्अनुषंगिक उपभोग्य वस्तू, वैद्यकिय उपकरणे, रूग्णालयीन फर्निचर, मेडिकल गॅस पाईपलाईन उभारणी करणे इ. बाबी प्रायोगिक तत्वावर प्रथमत: 1 वर्षाकरिता पुरविणेस परवानगी द्यावी. तद्नंतर हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) यांच्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरिता विचारण्यात यावा, या सुधारणेसह** सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **सुधारणेसह मंजूर** |
| **विषय क्र. 08**<br>**दिनांक 20 जून 2019** | सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथील 210 रुग्णखाटा तेरणा वैदयकिय महाविदयालय, नेरुळ यांना वैदयकिय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनार्थ देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 01/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/आस्था-2/3009/2019. |
| **ठराव क्र. 1130**<br>**दिनांक 25 जून 2019** | "सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथील 210 रुग्णखाटा तेरणा वैदयकिय महाविदयालय, नेरुळ यांना वैदयकिय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनार्थ देणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तेरणा वैद्यकिय महाविद्यालय, नेरूळ यांना सार्वजनिक रूग्णालय, वाशी येथे 210 रूग्णखाटा तेरणा वैद्यकिय महाविद्यालय, तेरणा दंत महाविद्यालय, तेरणा फिजिओथेरपी महाविद्यालय व तेरणा नर्सिग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनार्थ पुर्वीच्या करारनाम्यातील अटी / शर्ती तसेच प्रस्तावातील नमूद अटी / शर्तीनुसार दि. 1/08/2018 ते 30/06/2019 कार्योत्तर व दि. 1/7/2019 ते दि.31/7/2021 पर्यंत अशा एकूण 03 वर्षाच्या कालावधीसाठी देण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून सदर संस्थेस 03 वर्षाच्या कालावधीसाठी रूग्णखाटा देण्यात येत असल्या तरी दर वर्षी आढावा घेऊन मा.आयुक्त यांचेमार्फत पुढील वर्षासाठी कालावधी वाढवून देण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **मंज़ूर** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 09**<br>**दिनांक 20 जून 2019** | बहूऊद्देशिय इमारतीमधील जागा महापालिका क्षेत्राबाहेरील नागरीक/संस्था यांनी अर्ज केल्यास त्यासाठी भाडेदर निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1562/2019. |
| **ठराव क्र. 1131**<br>**दिनांक 25 जून 2019** | "बहूऊद्देशिय इमारतीमधील जागा महापालिका क्षेत्राबाहेरील नागरीक/संस्था यांनी अर्ज केल्यास त्यासाठी भाडेदर निश्चित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महापालिका क्षेत्राबाहेरील नागरीक/संस्था यांच्यासाठी सोबतच्या “परिशिष्ट-अ” मधील आयुक्तांनी शिफारस केलेले दर लागू करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 10**<br>**दिनांक 20 जून 2019** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन थेट पाणी पुरवठा होणाऱ्या भागासाठी महापे ते दिघा जलवाहिनी टाकणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1196/ 2019. |
| **ठराव क्र. 1132**<br>**दिनांक 25 जून 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन थेट पाणी पुरवठा होणाऱ्या भागासाठी महापे ते दिघा जलवाहिनी टाकणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सदर कामाकरीता IIT Bombay यांचेद्वारे Proof Cheking मध्ये सुचविणेत आलेल्या बदलामुळे अतिरिक्त बाबीं कराव्या लागत असल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय एकूण रक्कम रू. 10 कोटी, 88 लाख, 88 हजार 531 मात्र इतक्या सुधारीत खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 11**<br>**दिनांक 20 जून 2019** | नवी मुंबई महानगरपलिका कार्यक्षेत्रातील क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे क्रिडापटू व कलाकारांचा मा. सर्वसाधारण सभेत सन्मान करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ./352/2019. |
| **ठराव क्र. 1133**<br>**दिनांक 25 जून 2019** | "नवी मुंबई महानगरपलिका कार्यक्षेत्रातील क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे क्रिडापटू व कलाकारांचा मा. सर्वसाधारण सभेत सन्मान करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, क्रीडा/सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्याप्राप्त खेळाडू/क्रीडा मार्गदर्शक/क्रीडा संघटक व कलाकार/मान्यवरांचा सन्मान प्रस्तावातील अटी व शतीनुसार नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे क्रीडापटू व कलाकारांचा महानगरपालिकेच्या वतीने प्रस्तावातील धोरण अटी व शर्तीनुसार सन्मान करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **क्रिडा समितीकडे शिफारस** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 12**<br>**दिनांक 20 जून 2019** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध संस्थांव्दारे आयोजित मॅरथॉन व तत्सम स्पर्धाकरीता परवानगी धोरण व सुविधा सेवा शुल्क आकारणी करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ./353/2019. |
| **ठराव क्र. 1134**<br>**दिनांक 25 जून 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध संस्थांव्दारे आयोजित मॅरेथॉन व तत्सम स्पर्धाकरीता परवानगी धोरण व सुविधा सेवा शुल्क आकारणी करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील अ.क्र. 1 ते 16 च्या अटी व शर्तीनुसार महापालिका कार्यक्षेत्रामध्ये आयोजित मॅरेथॉन व तत्सम स्पर्धेकरीता सुविधा वापराबाबतचे परवानगी शुल्क दर प्रस्तावातील तक्त् यामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित शुल्क व सुरक्ष अनामत रक्कम अटी व शर्तीस अनुसरून शुल्क दर लागू करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **क्रिडा समितीकडे शिफारस** |
| **विषय क्र. 13**<br>**दिनांक 20 जून 2019** | घणसोली सेंट्रल पार्क मधील स्केटिंग रिंक, फुटबॉल टर्फ, क्रिकेट सराव पीच व ॲम्पीथिएटर वापराचे धोरण व भाडे शुल्क दरनिश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ./354/2019. |
| **ठराव क्र. 1135**<br>**दिनांक 25 जून 2019** | "घणसोली सेंट्रल पार्क मधील स्केटिंग रिंक, फुटबॉल टर्फ, क्रिकेट सराव पीच व ॲम्पीथिएटर वापराचे धोरण व भाडे शुल्क दरनिश्चित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील अटी व शर्ती क्र. 1 ते 18 नुसार **नमुंमपा घणसोली, से-3 येथील सेंट्रल पार्क मधील स्केटिंग रिंक / फुटबॉल टर्फ व क्रिकेट टर्फ पीच व ॲम्पीथिएटर वापराबाबतचे प्रस्तावित भाडे शुल्क दरपत्रक अ) स्केटींग रिंग भाडेशुल्क व ब) फुटबॉल टर्फ / क्रिकेट एरिना / ॲम्पीथिएटर भाडेशुल्कप्रमाणे** स्केटींग रिंक/फुटबॉल टर्फ/क्रिकेट टर्फ पीच/ॲम्पीथिएटर वापराचे धोरण सादर करण्यास, तसेच अटी व शर्तीस अनुसरून भाडे शुल्क दर लागू करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **क्रिडा समितीकडे शिफारस** |
| **विषय क्र. 14**<br>**दिनांक 20 जून 2019** | घणसोली सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबत धोरण व भाडेशुल्क निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ./355/2019. |
| **ठराव क्र. 1136**<br>**दिनांक 25 जून 2019** | "घणसोली सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबत धोरण व भाडेशुल्क निश्चित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील अटी व शर्ती क्र. 1 ते 31 नुसार तसेच **नमुंमपा घणसोली, से-3 येथील सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबचे प्रस्तावित शुल्क दराप्रमाणे** जलतरण तलाव वापराचे धोरण सादर करण्यास, तसेच अटी व शर्तीस अनुसरून शुल्क दर लागू करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **क्रिडा समितीकडे शिफारस** |
| **विषय क्र. 15**<br>**दिनांक 20 जून 2019** | आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा मुख्यालय इमारतीकरीता सामान तपासणीसाठी 3D X-ray baggage Inspection System मशीन हे सुरक्षा उपकरणखरेदी करुन आस्थापित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/आ.व्य./237/2019. |
| **ठराव क्र. 1137**<br>**दिनांक 25 जून 2019** | "आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा मुख्यालय इमारतीकरीता सामान तपासणीसाठी 3D X-ray baggage Inspection System मशीन हे सुरक्षा उपकरण खरेदी करुन आस्थापित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नवी मुंबई |

<table>
<tr><td></td><td>महानगरपालिकेचे मुख्यालय इमारतीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळा या शासकीय संस्थेने केलेल्या शिफारशीनुसार मुख्यालयात येणाऱ्या नागरीक व अभ्यांगत यांचे सामान तपासणीकरीता 3D X-ray baggage Inspection System हे सुरक्षा उपकरण खरेदी करणे व 3 वर्ष वारंटी कालावधी संपल्यानंतर पुढील 2 वर्ष देखभाल व दुरूस्ती (Comprihensive) करीता होणारा सर्व करासह एकूण खर्च रक्कम रू. 49 लाख, 33 हजार 580 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>मंजूर</td></tr>
<tr><td>विषय क्र. 16<br>दिनांक 20 जून 2019</td><td>मांस विक्री परवाना सुधारीत शुल्क लागु करणे, मांस वाहतुक परवाना शुल्क निश्चित करणे व तात्पुरता मांस विक्री परवाना देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/06/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/पसे/100/2019</td></tr>
<tr><td>ठराव क्र. 1138<br>दिनांक 25 जून 2019</td><td>"मांस विक्री परवाना सुधारीत शुल्क लागु करणे, मांस वाहतुक परवाना शुल्क निश्चित करणे व तात्पुरता मांस विक्री परवाना देणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, कायदेशीर तरतुद/नियम, वस्तुस्थिती, अर्ज शुल्क, सुरक्षा अनामत रक्कम व विलंब शुल्क या सुधारीत शुल्क लागु करण्याच्या प्रस्तावातील <u>दराऐवजी मा. सर्वसाधारण सभा खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.</u>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विक्री केंद्र प्रकार</th><th>नियमित वार्षिक परवाना शुल्क</th><th>नियमित वार्षिक परवाना शुल्कामध्ये मा.सर्वसाधारण सभेने केलेली शिफारस</th><th>त्रैमासिक तात्पुरता परवाना शुल्क</th><th>त्रैमासिक तात्पुरता परवाना शुल्कामध्ये मा.सर्वसाधारण सभेने केलेली शिफारस</th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td>3</td><td>4</td><td>5</td><td>6</td></tr>
<tr><td>1</td><td>चिकन विक्री</td><td>रू. 500/-</td><td>रू. 500/-</td><td>रू. 2500/-</td><td>रू. 1500/-</td></tr>
<tr><td>2</td><td>मटन विक्री</td><td>रू. 750/-</td><td>रू. 750/-</td><td>रू 3750/-</td><td>रू. 2250/-</td></tr>
<tr><td>3</td><td>ब्युफेन विक्री</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 5000/-</td><td>रू. 3000/-</td></tr>
<tr><td>4</td><td>पोर्क विक्री</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 5000/-</td><td>रू. 3000/-</td></tr>
<tr><td>5</td><td>चिकन व मटन एकत्रित विक्री</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 5000/-</td><td>रू. 3000/-</td></tr>
<tr><td>6</td><td>मासळी विक्री</td><td>रू. 300/-</td><td>रू. 50/-</td><td>रू. 1500/-</td><td>रू. 500/-</td></tr>
<tr><td>7</td><td>मासं/मासळी प्रक्रीया केंद्र (कोल्ड स्टोरेज)</td><td>रू. 10,000/-</td><td>रू. 10,000/-</td><td>तात्पुरता परवाना अनुज्ञेय नाही.</td><td>तात्पुरता परवाना अनुज्ञेय नाही.</td></tr>
<tr><td>8</td><td>मुळ गावठाणमधील मासळी प्रक्रिया व विक्री केंद्र</td><td>रू. 1000/-</td><td>रू. 500/-</td><td>रू. 3000/- अ</td><td>रू. 1500/-</td></tr>
<tr><td>9</td><td>इतर</td><td>रू. 500/-</td><td>रु.500/-</td><td>रू. 2500/-</td><td>रू. 2500/-</td></tr>
<tr><td>10</td><td>मांस/मासळी/पशुधन वाहतुक करणे.</td><td>रू.1000/- प्रती मे.टन वाहन क्षमता</td><td>रू.1000/-प्रती मे.टन वाहन क्षमता</td><td>रू. 3000/- प्रती मे.टन वाहन क्षमता</td><td>रू. 3000/- प्रती मे.टन वाहन क्षमता</td></tr>
</table>
<u>उपरोक्त परिशिष्टात महानगरपालिकेने केलेल्या सुधारणेसह</u> महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 386 (2) अन्वये, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी."</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>सुधारणेसह मंजूर</td></tr>
</table>

<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>

**माहे 25 जुन 2019 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 33 मधील भुखंड क्र. 8, सेक्टर-2 येथील सावली तलाव क्षेत्र सिडकोने महापालिकेस हस्तांतरीत केलेल्या भुखंडाचा विकास करण्यासाठी मागील तीन वर्षे अंदाजपत्रकात निधीची तरतुद केल्यानंतरही त्या निधीचा जबाबदार विभागांकडून विनियोग करण्यात आलेला नाही. तसेच त्या तलाव क्षेत्राच्या विकासाने बाधीत होणा-या पात्र नागरीकांच्या पुर्नवसनाची कोणतीही उपाय योजना कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदरील परिसरात बकालपणा वाढलेला आहे. तरी या गोष्टीला जबाबदार असलेल्या अधिकारी वर्गास योग्य समज देऊन त्या तलाव क्षेत्र परिसराचा विकास करणेसह शासनधोरणानुसार पात्र नागरीकांचे भरपाईसह पुर्नवसन करणे. | 17<br>जुन | 1139<br>25/06/2019 | मंजूर |
| 2. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 33 घणसोलीतील महापालिका विभाग कार्यालय हे अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या अरुंद रस्त्यालगत असल्याने तेथे मनपा अधिकृत वाहनांसह कामानिमित्त येणा-या वाहनांमुळे वाहतुक कोंडी होऊन नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे. तरी घणसोली स्टेशन व मुख्य महत्वाच्या मार्गाच्या परिसरातील सेक्टर-2 व अन्य सेक्टर मधील मनपाच्या ताब्यात असलेल्या मोठया क्षेत्रफळाच्या भुखंडातील एका भागावर सर्व सोई सुविधायुक्त विभाग कार्यालयाची उभारणी करणे. | 18<br>जुन | 1140<br>25/06/2019 | मंजूर |
| 3. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 33 घणसोलीतील महापालिका विभाग कार्यालय हे अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या अरुंद रस्त्यालगत असल्याने तेथे मनपा अधिकृत वाहनांसह कामानिमित्त येणा-या वाहनांमुळे वाहतुक कोंडी होऊन नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे. तरी मनपाने स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या प्राप्त अधिकारात जमीन अधिग्रहण कायादयानुसार घणसोली सेक्टर 2, 3, 7 यामधील सर्वसाधारण वापरासाठीचे मोकळे भुखंड अधिग्रहीत करुन सर्व सोई सुविधायुक्त विभाग कार्यालयाची उभारणी करणे. | 19<br>जुन | 1141<br>25/06/2019 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | **श्रीमती.सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालये या व अशा अन्य अत्यावश्यक नागरी सेवा सुविधेशी निगडीत वर्ग प्रवर्ग अ ,ब, क यामधील अनेक पदे हि रिक्त राहिलेली आहेत. त्यामुळे नागरिकांना योग्य सुविधा मिळत नाहीत. याची दखल नोंद घेऊन महानगरपालिकेतील वर्ग प्रवर्ग अ, ब, क रिक्त पदनामांवर महानगरपालिकेतील पात्र कर्मचारी अधिकारी वर्गास पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश जबाबदार विभाग प्रमुखांना देऊन जनहितार्थ त्याची तातडीने कार्यवाही व कार्यपुर्तता करणे. | 20<br>जुन | 1142<br>25/06/2019 | मंजूर |
| 5. | **श्रीमती.सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>महानगरपालिका ज्याप्रमाणे महापौर बंगल्याजवळील भुखंड हे अधिग्रहीत करण्याची कार्यवाही कार्यपुर्तता केली आहे. त्याचप्रमाणे नेरुळ नोडचा पुर्व पश्चिम क्षेत्राचा झालेला व होणारा संभाव्य विकास विचारार्थ घेऊन स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या प्राप्त अधिकारात जमीन अधिग्रहण कायदयानुसार मनपा नेरुळ विभाग कार्यालयासाठी नेरुळ नोडमधील मोकळे भुखंड अधिग्रहीत करण्याची कार्यपुर्तता करुन तिथे सर्व सोई सुविधायुक्त महानगरपालिका विभाग कार्यालयाची उभारणी करणे. | 21<br>जुन | 1143<br>25/06/2019 | मंजूर |
| 6. | **श्रीमती.सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>देशात राज्यात व नवी मुंबई शहरासह सर्वत्र जुने पादचारी उड्डाणपुल पडण्याच्या दुर्घटना घडत आहेत. याची दखल घेऊन नेरुळ पुर्व पश्चिमेला जोडणा-या 25 वर्षापुर्वीच्या जुन्या दुरावस्थेमधील अरुंद असणा-या पादचारी पुलाच्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करणे. | 22<br>जुन | 1144<br>25/06/2019 | मंजूर |
| 7. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>सिडकोच्या शहर नियोजन आराखडयानुसार आरोग्य, बाजार मंडई, उदयान इ. नागरी सेवा सुविधांच्या महानगरपालिकेच्या ताब्यातील आरक्षित परंतु अविकसित असलेल्या भुखंडांचा आरक्षणाच्या वापरानुसार तातडीने विकास करण्याची कार्यवाही कार्यपुर्तता करणे. | 23<br>जुन | 1145<br>25/06/2019 | मंजूर |
| 8. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>शासनाने मंजुर केलेल्या नमुंमपाच्या पदसंख्या व आकृतीबंधातील तपशीलात उल्लेखिलेल्या पदनामांमधील रिक्त पदनामांवर महानगरपालिकेतील पात्र पालिका सेवक वर्गास पदोन्नती देवुन त्या सेवक वर्गाच्या ज्ञानाचा अनुभवाचा वापर करदात्या नागरीकांना निर्दोष नागरी सेवा सुविधा देण्यासाठी करणे. | 24<br>जुन | 1146<br>25/06/2019 | मंजूर |
| 9. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 103, मधील माता रमाबाई आंबेडकर नगर ते छत्रपती संभाजी नगर या दिशेकडील मध्यवर्ती पावसाळी नाल्याला संरक्षक भिंत नसल्यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. तरी त्या ठिकाणी संरक्षक भिंतीसह सुरक्षा जाळीची तरतुद करणे. | 25<br>जुन | 1147<br>25/06/2019 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | **डॉ. जयाजी के नाथ, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालय आणि माता बाल रुग्णालयामध्ये आयुर्वेदिक/ होमीओपॅथीक ओपीडी विभाग सुरु करणे व त्यास तत्सम आयुर्वेदिक/होमीओपॅथीक औषधे योग्य प्रमाणात उपलब्ध करणे, तसेच मुंबई महानगरपालिकेप्रमाणे काही प्रमाणात आयुर्वेदिक व होमीओपॅथीक डॉक्टरांची भरती करणे. | 26 / जुन | 1148 / 25/06/2019 | मंजूर |
| 11. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्र.क्र. 49, सेक्टर 9 व 10 च्या बाजुला असलेल्या उद्यानाचे कंपाऊंड वॉल जुने झाल्याने, संपूर्ण खराब झाले आहे. तरी सदर ठिकाणी उद्यानास नवीन कंपाऊड वॉल बसविणे. | 27 / जुन | 1149 / 25/06/2019 | मंजूर |
| 12. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्र.क्र. 49, सेक्टर 10 येथील प्लॉट नं. 8 ए वर असलेले उद्यान सुशोभिकरण करणे. | 28 / जुन | 1150 / 25/06/2019 | मंजूर |
| 13. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्र.क्र. 49, मधील सर्व पथ दिव्यांना LED दिवे लावणे. | 29 / जुन | 1151 / 25/06/2019 | मंजूर |
| 14. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्र.क्र. 12, सेक्टर 2 येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात जेष्ठ नागरीकांकरिता विरंगुळा केंद्र बांधणे. | 30 / जुन | 1152 / 25/06/2019 | मंजूर |
| 15. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्र.क्र. 12, सेक्टर 2 येथील नमुंमपा मार्फत स्वर्गीय हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे बहुउददेशिय ईमारत उभारण्यात आली असुन, दुस-या व तिस-या मजल्यावर अभ्यासिका केंद्राची व्यवस्था करण्यांत आली आहे. सदर ठिकाणी विदयार्थ्यांना बसण्याकरिता बॅचेंस तसेच पुस्तकांकरिता कपाटांची व्यवस्था करण्यांत यावी. ईमारतीच्या चारही बाजूस लोखंडी ग्रील बसविण्यात यावी. त्याचप्रमाणे ईमारतीच्या टॅरेसवर विदयार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्याकरिता अदयावत पत्राशेड उभारणे. | 31 / जुन | 1153 / 25/06/2019 | मंजूर |
| 16. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्र.क्र. 12, सेक्टर 2 येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान तसेच साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे उद्यानात नागरीकांना बसण्याकरिता गजेबो बांधणे. | 32 / जुन | 1154 / 25/06/2019 | मंजूर |
| 17. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16, छत्रपती संभाजी राजे उद्यान सुशोभिकरण करणे. | 47 / जुन | 1155 / 25/06/2019 | मंजूर |
| 18. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16ए, भुखंड क्र. 150 व 151 हे सुशोभिकरण करणे. | 48 / जुन | 1156 / 25/06/2019 | मंजूर |
| 19. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16, छत्रपती संभाजी राजे उद्यानात विरंगुळा केंद्र उभारणे. | 49 / जुन | 1157 / 25/06/2019 | मंजूर |
| 20. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35, घणसोली मधील भुखंड क्र.4 सामाजिक सुविधा-1 व भुखंड क्र.5 सामाजिक सुविधा-2 या आरक्षित भुखंडावर घणसोली कॉलनीमधील नागरिकांकरीता सांस्कृतिक समाज हॉल, मुलांसाठी अभ्यासिका, लायब्ररी, व्यायामशाळा व बाजार मंडई करणे. | 50 / जुन | 1158 / 25/06/2019 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 35, घणसोली वसाहतीला लागून असणाऱ्या मोठया नाल्यामध्ये असणारा गाळ काढणे व नाल्याची दोन्ही बाजुनी संरक्षक भिंती बांधून नाल्यामध्ये पीसीसी कायमस्वरुपी स्वरुपात करणे. | 51<br>जुन | 1159<br>25/06/2019 | मंजूर |
| 22. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 23, ऐरोली सेक्टर 10ए, येथील सिग्नीया असोशिएशन सोसायटी शेजारी नाला बांधणे. | 52<br>जुन | 1160<br>25/06/2019 | मंजूर |
| 23. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 23, ऐरोली, सेक्टर 10, येथे यशवंतराव चव्हाण उद्यानात जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र बांधणे. | 53<br>जुन | 1161<br>25/06/2019 | मंजूर |
| 24. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, मधील जुन्या असलेल्या पिवळया रंगाच्या दिव्यांचा प्रकाश रस्त्यावर कमी पडत असल्यामुळे येथील नागरिकांना गैरसोईचा सामना करावा लागत असल्यामुळे येथे एल.ई.डी. चे दिवे लावणे. | 54<br>जुन | 1162<br>25/06/2019 | मंजूर |
| 25. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, मधील बऱ्याच ठिकाणी पदपथावरील चेंबरची झाकणे तुटलेल्या आवस्थेत असून त्या ठिकाणी एफ.आर.बी. झाकणे बसविणे. | 55<br>जुन | 1163<br>25/06/2019 | मंजूर |
| 26. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, मधील सेक्टर 18 येथील कै. तुकाराम ओंबळे समाज मंदिर मध्ये विभागातील विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची सोय उपलब्ध करुन देणे. | 56<br>जुन | 1164<br>25/06/2019 | मंजूर |
| 27. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 101, मधील कोकण भवन सेक्टर -10 येथील पार्किंगच्या समोर व सायन पनवेल महामार्गाला लागून असलेल्या ना दुरुस्त नाल्याचे नुतनीकरण करणे. | 60<br>जुन | 1165<br>25/06/2019 | मंजूर |
| 28. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी गांव येथील नमुंमपा शाळा क्र. 3, जवळील व्यायामशाळा हि जिल्हाधिकारी ठाणे (कलेक्टर) यांनी 25 ते 30 वर्षापुर्वी बांधलेली ही व्यायामशाळा आजही त्या ठिकाणी सुविधांअभावी कार्यरत नाही. आग्रोळी गावातील तरुणांना व्यायाम करण्यासाठी सी.बी.डी. सीवूड्स किंवा नेरुळ येथे दूर जावे लागते. त्यामुळे सदरची पत्राशेड असलेली जुनी व्यायामशाळा पाडून त्या ठिकाणी नव्याने सर्व सुविधांयुक्त नवीन व्यायाम साहित्यासह नवीन व्यायामशाळेची इमारत बांधणे. | 61<br>जुन | 1166<br>25/06/2019 | मंजूर |
| 29. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 101, मधील सेक्टर 25 येथील निलगीरी गार्डन को.हौ.सोसायटी व एकता विहार सोसायटी समोरील मुख्य रस्त्यालगत असलेल्या गटर्स व फुटपाथची दुरावस्था झाली आहे. एकता विहार सोसायटीच्या गेट नं. 1 जवळ गटारे तुटलेली आहेत. काही ठिकाणी गटारांचे बांधकामही झालेले नाही. कच्चे गटर मधून पावसाळी पाणी सुध्दा पास होत नाही व पावसाचे पाणी सोसायटीमध्ये येण्याची दाट शक्यता आहे. निलगीरी सोसायटी समोर अनेक ठिकाणी | 62<br>जुन | 1167<br>25/06/2019 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | फुटपाथ तुटलेल्या अवस्थेत आहेत. इंटरलॉक निघालेले आहेत. त्यामुळे रहिवाश्यांना चालण्यास अडथळा निर्माण होत आहे. तरी सदर गटारे व फुटपाथ नव्याने बांधणे. | | | |
| **30.** | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील मुख्य रस्त्यांच्या पदपथांची दुरुस्ती करणे. | 63<br>जुन | 1168<br>25/06/2019 | मंजूर |
| **31.** | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील सेक्टर 3,6,व 7 मध्ये सेवरेज लाईनची दुरुस्ती करणे. | 64<br>जुन | 1169<br>25/06/2019 | मंजूर |
| **32.** | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे सेक्टर 6 येथील रुम नं. 10 ते रुम नं. 244 मधील मुख्य रस्त्यावरील सेवरेज लाईनची दुरुस्ती करणे. | 65<br>जुन | 1170<br>25/06/2019 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**